.nagpur

# NMC e NEWS LETTER

मे २०१८

/nmcngp/ /ngpnmc/ www.nmcnagpur.gov.in/ http://news.nmcnagpur.org/



## थोडक्यात



### परिवहन सभापतीपदी जितेंद्र कुकडे यांची अविरोध फेरनिवड

नागपूर : नागपूर महानगरपालिका परिवहन समितीच्या सभापतिपदी जितेंद्र (बंटी) कुकडे यांची अविरोध फेरनिवड झाली.परिवहन समिती सभापतीपदाचा एक वर्षाचा कार्यकाळ संपल्यामुळे शुक्रवारी (ता. २५) या पदासाठी निवडणूक घेण्यात आली. सकाळी ११ वाजतापर्यंत नामांकन अर्ज दाखल करण्याच्या वेळेपर्यंत केवळ नगरसेवक जितेंद्र कुकडे यांनी दोन नामांकन पत्र दाखल केले होते. एका नामांकन पत्राच्या सूचक नगरसेविका अर्चना पाठक तर अनुमोदक विद्या मडावी होत्या. दुसऱ्या नामांकन पत्राच्या सूचक अभिरुची राजगिरे आणि अनुमोदक उज्वला शर्मा होत्या. छानणी अंती दोन्ही नामांकन पत्र वैध ठरले. एकाचे उमेदवाराचे नामांकन अर्ज असल्यामुळे पीठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी अश्विन मुदगल यांनी जितेंद्र कुकडे यांना अविरोध विजयी घोषित केले. निवडीनंतर पीठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी अश्विन मुदगल यांनी सभापतीपदी निवड झालेले जितेंद्र कुकडे यांचे तुळशीचे रोप देऊन स्वागत केले. यावेळी अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, निगम सचिव हरिश दुबे, परिवहन व्यवस्थापक शिवाजी जगताप आणि परिवहन समितीचे सदस्य उपस्थित होते.

### वीरेंद्र सिंह नागपूर मनपाचे नवे आयुक्त



नागपूर : नागपूर महानगरपालिकेचे नवे आयुक्त म्हणून वीरेंद्र सिंह यांनी पदाचा कार्यभार स्वीकारला. मावळते आयुक्त अश्विन मुदगल यांनी त्यांच्याकडे सूत्रे सोपविली आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.यावेळी अपर आयुक्त रवींद्र कुंभारे, सहायक आयुक्त महेश धामेचा, स्मार्ट अण्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रामनाथ सोनवणे, सेवानिवृत्त अपर आयुक्त व एनईएसएलचे संचालक डॉ. आर. झेड. सिद्दिकी, जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर, सहायक जनसंपर्क अधिकारी प्रदीप खडणवीस उपस्थित होते. मनपा आयुक्त वीरेंद्र सिंह हे यापूर्वी मंत्रालयात नगर पालिका प्रशासनचे संचालक व आयुक्त म्हणून

### मान्सूनपूर्व तयारीसाठी महापौर, आयुक्तांची आढावा बैठक

नागपूर : पावसाळ्यातील संभाव्य नैसर्गिक आपत्ती वर उपाययोजना म्हणून महापालिकेची यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देश महापौर नंदा जिचकार यांनी दिले. मंगळवार (ता.२२) मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीत मान्सूनपूर्व तयारीची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी त्या बोलत होत्या.यावेळी आयुक्त वीरेंद्र सिंह, अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, अतिरिक्त उपायुक्त राजेश मोहिते, कार्यकारी अभियंता (विद्युत) संजय जैस्वाल, कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) संजय गायकवाड, कार्यकारी अभियंता अनिरूद्ध चौंगजकर, कार्यकारी अभियंता मोती कुकरेजा, कार्यकारी अभियंता सतीश नेरळ, सी.जी. धकाते, मुख्य अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके प्रामुख्याने उपस्थित होते. प्रशासनाने केलेल्या मान्सूनपूर्व तयारीचा आढावा महापौरांनी अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे आणि मुख्य अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके यांच्यामार्फत घेतला. महापालिकेद्वारे नैसर्गिक पूर प्रतिबंधक आराखडा १ जून ते ३० सप्टेंबरपर्यंत राबविण्यात येणार आहे. झोनस्तरावर एक नियंत्रण कक्ष स्टॅण्डर्ड ऑपरेटिंग सिस्टीम दोन दिवसात उभारण्याचे निर्देश आयुक्त वीरेंद्र सिंह यांनी दिले. दहाही झोनमधील नियंत्रण कक्षातील आपतकालीन मोबाईल क्रमांकांची यादी मुख्यालयातील नियंत्रणकक्षालादेण्यात यावी, असे आदेश आयुक्तांनी दिले. नियंत्रण कक्षाला अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त यांच्या पथकाने आकस्मिक भेट द्यावी, त्याठिकाणी गैरहजर असलेल्या अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश आयुक्त वीरेंद्र सिंह यांनी दिले. रस्त्यांवरील झाडांच्या वाढलेल्या फांद्याची छाटणी करण्याचे आदेश महापौर नंदा जिचकार यांनी संबंधित विभागाला दिले. झोनमध्ये असलेले पाणी उपसण्याचे पंप, मशीन्स व पावसाळ्यात लागणारे उपकरणे दुरूस्त करून ठेवण्याचे व झोननिहाय उपकरणे, पंप, मशीन्स याची यादी मुख्य अग्निशमन अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात यावी, असे आदेश आयुक्त वीरेंद्र सिंह यांनी दिले. जीर्ण झालेल्या इमारतींची यादी तयार करून त्या इमारतींची माहिती झोन सहायक आयुक्ताला द्यावी, असे निर्देश आयुक्तांनी दिले. गडरलाईन स्वच्छ करण्यात यावी, गडर उघडे असतील तर त्यावर पावसाळ्यापूर्वी झाकणे लावण्याचे निर्देश अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे यांनी दिले. दर पावसाळ्यात नरेंद्र नगर पुलाखाली पाणी साचते त्याची पर्यायी सोय प्रशासनाने काय केली आहे, याचा आढावा महापौरांनी घेतला. त्यावर नरेंद्र नगर पुलाखाली पाणी साचल्यास तो रस्ता बंद करण्यात यावा, पर्यायी रस्त्याचा वापर करण्याची सूचना देणारा फलक त्या ठिकाणी लावण्याचे आदेश आयुक्त वीरेंद्र सिंग यांनी दिले.

# परिवहन समितीचा अर्थसंकल्प स्थायी समितीकडे सुपूर्द

## मागील वर्षी केलेल्या आठ संकल्पांची पूर्ती : वीर माता, भगिनींसाठी मोफत प्रवास



नागपूर : नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन समितीच्या वतीने २४४.८२ कोटी उत्पन्नाचा, २४४.५७ कोटी खर्चाचा आणि २५.०३ लाख शिलकीचा अर्थसंकल्प सभापती बंटी कुकडे यांनी स्थायी समितीचे सभापती वीरेंद्र कुकरेजा यांच्याकडे सादर केला.सादर केलेल्या अर्थसंकल्पानुसार सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प 'ब'चे उत्पन्न २४४.७१ कोटी अपेक्षित आहे. सुरुवातीची शिल्लक ११.२८ लाख धरून एकूण अपेक्षित उत्पन्न २४४.८२ कोटी राहील. त्यातील २४४.५७ कोटी खर्च होईल, असे अपेक्षित आहे. अर्थसंकल्पात नमूद केल्यानुसार चालू आर्थिक वर्षात इथेनॉल इंधनावर संचालित ५५ ग्रीन बस, तीनही डिझेल बस ऑपरेटरच्या माध्यमातून २३६ डिझेल बस, १५० मिडी बस तसेच महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार महिलांसाठी स्वतंत्र तेजस्वीन मिडी बसेस संचालित करण्याचा नागपूर महानगरपालिकेचा मानस आहे. पर्यावरणपूरक धोरण राबविणे हा नागपूर महानगरपालिका परिवहन विभागाचा मानस असून याअंतर्गत २५ बायोगॅस बसेस, ७० इलेक्ट्रिक बसेस अशा एकूण ५३६ बसेसे 'आपली बस'च्या ताफ्यात दाखल होत आहे.

**वीर माता, भगिनींसाठी मोफत प्रवास** चालू आर्थिक वर्षात परिवहन समितीतर्फे अनेक नवीन आणि महत्त्वाकांक्षी योजना अंमलात आणण्यात येणार आहे. त्यामध्ये 'मी जिजाऊ' मोफत प्रवास सवलत योजनेअंतर्गत देशासाठी कर्तव्यावर तैनात असताना शहीद झालेल्या आणि मनपातील अग्निशमन व आणीबाणी विभागातील शहीद झालेल्या वीर जवानांच्या कुटुंबातील शहीदांच्या वीर माता, वीर भगिनी आणि वीर कन्या यांना 'तेजस्विनी बस तथा सर्वच शहर बस सेवेतील बस' मध्ये मोफत बस पास उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. यासाठी १५ लाख रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. बस थांब्यालगत वॉटर एटीएमची निर्मिती करण्यात येणार असून त्यासाठी दोन कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. इलेक्ट्रिक बस चार्जिंग स्टेशन, सौर ऊर्जेद्वारे विद्युत निर्मिती करून इलेक्ट्रिक बस चार्ज करण्यासाठी त्याचा उपयोग यासाठी तीन कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. समाजकल्याण विभागामार्फत प्रमुख बस स्थानकावर व्हिल चेअरची उपलब्धता, बस स्थानकावर वेळापत्रक लावणे, जाहिरात कंत्राट देऊन उत्पन्न स्त्रोत वाढविणे यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहे. ज्या थांब्यावर शेड नाही अशा ६०० थांब्यावर नावीन्यपूर्ण फलकाची निर्मिती करून थांब्यावरील बस पार्किंगची जागा राखीव करण्याकरिता नावीन्यपूर्ण रंगसंगतीचे पेंटिंग करण्यात येणार आहे. यासाठी अर्थसंकल्पात एक कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**डेपोसाठी नवीन जागा** सध्या डिझेल बस ऑपरेटर्सकरिता असलेल्या डेपो व्यतिरिक्त शहराच्या पूर्व भागात वाठोडा येथे मनपाच्या १०.८० एकर जागेवर डिझेल बस डेपोकरिता जागा विकसित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. ग्रीन बस ऑपरेटरकरिता वाडी नाका येथे डेपोकरिता जागा विकसित करून देण्याचे काम पूर्णत्वास आले आहे. खापरी नाका येथे इथेनॉल पंप उभारणी करण्या आली आहे.

**आठ संकल्पांची पूर्ती** परिवहन समितीद्वारे प्रवाशांना कार्यक्षम सेवा पुरविणे व विभागाच्या कामकाजात गतिमानता आणण्याच्या दृष्टीने मागील वर्षी दहा संकल्प समितीने निश्चित केले होते. त्यातील आठ संकल्प पूर्णत्वास आल्याचा विश्वास सभापती बंटी कुकडे यांनी अर्थसंकल्पात केला आहे. 'मागेल त्याला बस' या तत्वावर ६५ नवीन मार्गावर नव्याने बस फेऱ्यांची सुरुवात करण्यात आली. ज्येष्ठ नागरिकांना प्रवास भाड्यात भारतरत्न अटलबिहारी बाजपेयी योजनेअंतर्गत सवलत देण्याची अंमलबजावणीही करण्यात आली. ज्या दोन संकल्पाची पूर्ती अद्याप झाली नाही त्यामध्ये बस थांब्यालगत उपाहार गृहाची निर्मिती करणे, त्यासाठी बेरोजगार युवकांना काळजीवाहक म्हणून

# मनपाच्या जागेवरील अतिक्रमण तातडीने काढा : आयुक्त

## पिवळी नदी, लेंडी तलावालाही दिली भेट : नदी स्वच्छता अभियानाची पाहणी

नागपूर : लकडगंज झोन कार्यालयाच्या मागे नागपूर महानगरपालिकेचा भूखंड आहे. या संपूर्ण जागेवर भटक्या लोकांनी मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण केले आहे. ते अतिक्रमण तातडीने उठवा आणि संपूर्ण जागेवर सुरक्षा भिंत बांधा, असे निर्देश मनपा आयुक्त वीरेंद्र सिंह यांनी दिले. आयुक्तांनी २५ मे रोजी सकाळी ८ वाजता लकडगंजमधील संबंधित जागेला भेट दिली. यावेळी त्यांच्यासोबत अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, कार्यकारी अभियंता (प्रकल्प) नरेश बोरकर, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ. प्रदीप दासरवार, जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर उपस्थित होते. मनपाच्या मोक्याच्या जागेवर असलेल्या भूखंडावर असलेले अतिक्रमण पाहून आयुक्त वीरेंद्र सिंह यांनी चिंता व्यक्त केली. अशा जागांवर अतिक्रमण होण्याची वाट बघू नका. अशा जागांना सुरक्षा भिंतीचे कवच द्या. अतिक्रमण जेथे-जेथे आहे ते तातडीने हटवा, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले. यानंतर त्यांनी जुन्या भंडारा मार्गावरील इतवारी रेल्वेस्थानक पुलानजिकच्या मटन मार्केट असलेल्या हरिगंगा इमारतीची पाहणी केली. सहायक आयुक्त (बाजार) विजय हुमणे यांनी आयुक्तांना इमारती बाबतची माहिती दिली. या इमारतीसंदर्भातही आयुक्तांनी आवश्यक ते निर्देश संबंधितांना दिला. यानंतर पिवळी नदीच्या ज्या भागात स्वच्छता अभियान सुरू आहे, त्या गौतम नगर, समता नगर परिसराला भेट दिली. स्वच्छता अभियानादरम्यान काढण्यात येणारा गाळ भिंतीला रेटून लावा. त्यानंतर तो गाळटिप्परने इतरत्र हलवा जेणेकरून पाण्यासोबत तो वाहून जाणार नाही, असे निर्देश दिले. पिवळ्या नदीच्या तीराची मालकी पूर्णपणे नागपूर महानगरपालिकेची आहे. या तीरावरची घाण स्वच्छ करून येथे वृक्षारोपण करा, जेणेकरून भविष्यात अतिक्रमण होणार नाही, असे निर्देश त्यांनी दिले. यानंतर आयुक्त वीरेंद्र सिंह यांनी लेंडी तलावाची पाहणी केली. या ठिकाणी उपमहापौर दीपराज पार्डीकर हे सुद्धा उपस्थित झाले. त्यांनी तलावा लगतच्या अतिक्रमणाची माहिती आयुक्तांना दिली.तलावाचे पाणी निघून जाण्यासाठी असलेल्याआऊटलेटवर मोठे अतिक्रमण आहे. त्यामुळे पाणी निघून जाण्याचा मार्ग बंद झाल्याची माहिती उपमहापौर दीपराज पार्डीकर यांनी दिली. तलाव पूर्णपणे वनस्पतींनी व्यापलेला आहे, याबाबत आयुक्तांनी चिंता व्यक्त केली. मागील वर्षीही तलावाच्या स्वच्छतेसाठी १५ लाखांचा निधी खर्च करण्यात आला. परंतु जोपर्यंत तलावावरील अतिक्रमण हटविले जात नाही, तोपर्यंत तलाव स्वच्छ होणार नाही, हे वास्तव श्री. पार्डीकर यांनी सांगितले. लेंडी तलावासंदर्भात तातडीने सुधारीत प्रस्ताव तयार करण्यात यावा. अतिक्रमणधारकांना नोटीस देऊन तातडीने अतिक्रमण हटविण्यात यावे, असे निर्देश आयुक्त वीरेंद्र सिंह यांनी सतरंजीपुरा झोनचे सहायक आयुक्त प्रकाश वऱ्हाडे यांना दिले. आयुक्तांच्या दौऱ्यात संबंधित ठिकाणचे अधिकारी उपस्थित होते. यामध्ये



### मनपा अधिकारी-कर्मचाऱ्यांचे गांधीसागर स्वच्छतेसाठी श्रमदान

नागपूर : नागपूर महानगरपालिकेद्वारे गांधीसागर तलाव येथे गुरूवारी (ता.२४) सकाळी ७ ते ९ या दरम्यान श्रमदान करण्यात आले. महापालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांचा यात विशेष सहभाग होता. यावेळी आयुक्त वीरेंद्र सिंह आणि अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे यांनी संपूर्ण तलाव परिसराची पाहणी केली.यावेळी त्यांच्यासमवेत धंतोली झोन सभापती विशाखा बांते, नगरसेवक प्रमोद चिखले, नगरसेविका हर्षला साबळे, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ.प्रदीप दासरवार, उद्यान अधीक्षक अमोल चोरपगार, धंतोली झोनचे प्रभारी सहायक आयुक्त राजू भिवगडे, माजी नगरसेवक मनोज साबळे, जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर प्रामुख्याने उपस्थित होते. नागपूर महानगरपालिकेद्वारे गांधीसागर तलाव येथे स्वच्छता अभियान सुरू करण्यात आले आहे. त्याच्या कामाची झोननिहाय आखणी करण्यात आली असून प्रत्येक झोनच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा यात सहभाग आहे. तलावाच्या बाजूचा सर्व परिसर स्वच्छ करण्याचे निर्देश आयुक्त वीरेंद्र सिंह यांनी दिले. तलावाच्या लगत असलेल्या झाडांच्या वाढलेल्या फांद्या छाटा, हे करताना तलावाचे सौंदर्य कायम राहील, याची विशेष काळजी घेण्यात यावी, असे निर्देश आयुक्त वीरेंद्र सिंह यांनी दिले. तलावाच्या लगत असलेल्या पायऱ्या आणि संरक्षक भिंत खचण्याच्या मार्गावर आहे. त्याची डागडुजी त्वरित करण्यात यावी, असे निर्देश आयुक्त वीरेंद्र सिंह यांनी दिले.

# सौंदर्यीकरणातील बाधितांना महापौरांच्या हस्ते घरकुल वाटप

## नारा-नारी येथे पुनर्वसन : ६१ जणांना दिले घरकुल वाटप पत्र



नागपूर : तेलीपुरा-तांडापेठ येथील नाईक तलाव सौंदर्यीकरणात जी घरे जात आहेत त्या लोकांचे व अन्य विकास प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन नारा-नारी येथे करण्यात आले आहे. तेथे बांधण्यात आलेल्या घरकुलांचे वाटपपत्र २३ मे रोजी महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते महापौर कक्षात नागरिकांना वाटप करण्यात आले.केंद्र व राज्य शासन पुरस्कृत जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानांतर्गत शहरी गरीब नागरिकांना मुलभूत सुविधा या योजनेअंतर्गत मंजूर प्रकल्पानुसार नारा नारी या वस्तीत सदर घरकुलांचे बांधकाम करण्यात आले आहे. या योजने अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना प्रत्येकी एकूण २५ चौ.मी. (२६९ चौ. फूट) चटई क्षेत्राच्या बांधकामात एक बैठक खोली, एक शयन कक्ष, एका स्वयंपाकाच्या खोलीसह शौचालय व स्नानगृह इत्यादी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. सदर योजनेअंतर्गत ५० टक्के वाटा केंद्र शासन, ३० टक्के वाटा राज्य शासन तर उर्वरीत वाटा महानगरपालिका व लाभार्थ्याला उचलावा लागतो. महापौर कक्षात महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते लाभार्थ्यांना नागपूर महानगरपालिकेअंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या वतीने घरकुल वाटपपत्र प्रदान करण्यात आले. नाईक तलाव परिसरातील विकास कामासाठी बाधित झालल्या ७१ कुटुंबांपैकी ४० पात्र लाभार्थ्यांना तसेच इंदिरा नगर नाला परिसरातील दोन, संजय गांधी नगर नाला परिसरातील आठ, भीमरत्न नगर परिसरातील १० व बोरियापुरा येथील एक अशा एकूण ६१ लाभार्थ्यांचा यात समावेश आहे. यावेळी उपमहापौर दीपराज पार्डीकर, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे उपअभियंता आर.जी. राहाटे, उपअभियंता पंकज पाराशर, जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर उपस्थित होते. प्रातिनिधिक स्वरूपात लक्ष्मी वासुदेव खंडारे, मोगरा मुरली साहू, पंढरी कृष्णा पिंपरीकर, राधाबाई चंद्रशेखर सावरकर, अन्नपूर्णा अन्नाजी चांदेकर, लिला पंढरी हेडाऊ, दामू महालू सोनकुसरे, नैनाबाई सिन्हा, कलाबाई खापेकर, मालाबाई बन्सोड, आशा कुशाल कांबळे, कल्पना प्रकाश ढवळे यांना घरकुल वाटपपत्र देण्यात आले.

# थोडक्यात...

## महाराष्ट्र दिनानिमित्त मनपात ध्वजारोहण



नागपूर : महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ५८ वर्धापन दिनानिमित्त नागपूर महानगर पालिकेच्या केंद्रीय कार्यालयात महापौर नंदा जिचकार यांनी हस्ते ध्वजारोहण केले. महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या यावेळी शुभेच्छा दिल्या.यावेळी अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, निगम सचिव हरिश दुबे, सहायक आयुक्त (साप्रवि) महेश धामेचा, मुख्य अभियंता मनोज तालेवार, प्रभारी अधीक्षक अभियंता संजय गायकवाड, सहायक संचालक (नगररचना) प्र.आ. गावंडे, कार्यकारी अभियंता डी.डी.जांभूळकर, प्रदीप राजगिरे, प्र. आरोग्य अधिकारी डॉ. प्रदीप दासरवार, डॉ. नरेंद्र बहिरवार, हिवताप अधिकारी जयश्री थोटे, मुख्य अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके, निगम अधीक्षक राजन काळे यांचेसह मनपा व अग्निशमन दलाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## शांतनु गोयल मनपाचे अतिरिक्त आयुक्त

नागपूर : नागपूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त म्हणून शांतनु गोयल यांनी गुरूवारी (ता.२४) अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे यांच्याकडून कार्यभार स्वीकारला. यावेळी जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर, सहायक जनसंपर्क अधिकारी प्रदीप खर्डेनवीस, अग्निशमन विभागाचे सुनील राऊत प्रामुख्याने उपस्थित होते.शांतनु गोयल हे मूळचे कानपूरचे आहेत. भारतीय प्रशासकीय लोकसेवेच्या २०१२ तुकडीचे अधिकारी आहेत. यापूर्वी शांतनु गोयल हे गडचिरोली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी होते. त्यापूर्वी ते राजुरा येथे उपविभागीय अधिकारी होते. यानंतर ते नागपूर महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी रुजू झाले.




## पाच हजारांवर गप्पी मासे पाण्यात सोडले

### डेंग्यू दिवस : हिवताप व हत्तीरोगविभागातर्फे दहाही झोनमध्ये प्रभातफेरी

नागपूर : राष्ट्रीय डेंग्यू दिनाचे औचित्य साधून नागपूर महानगरपालिकेच्या हिवताप व हत्तीरोग विभागातर्फे दहाही झोनमध्ये 'गप्पीमासे वितरण काढण्यात आली. या दरम्यान शहरभरात निरनिराळ्या ठिकाणच्या पाण्यामध्ये सुमारे पाच हजारांवर गप्पी मासे सोडण्यात आले.दहाही झोनअंतर्गत काढण्यात आलेल्या प्रभातफेरीमध्ये स्थायी समिती सभापती वीरेंद्र कुकरेजा, विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, धंतोली झोन सभापती विशाखा बांते, नेहरूनगर झोन सभापती रिता मुळे, धरमपेठ झोन सभापती प्रमोद कौरती, नगरसेविका रेखा साकोरे, वनिता दांडेकर, रूपा राय, शीतल कामडे, जयश्री वाडीभस्मे, दिव्या धुरडे, झिशान मुमताज अंसारी, आशा ऊईके, सैय्यदा बेगम, कांता रारोकर, भावना संतोष लोणारे, मंगला योगेश लांजेवार, नगरसेवक सुनील हिरणवार, मनोज सांगोळे, सतीश होले, संजय चावरे, हिवताप व हत्तीरोग अधिकारी जयश्री थोटे, जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर, राजू वराटे, विजय काळे सहभागी झाले होते. प्रभातफेरीच्या प्रारंभी उपस्थित नागरिकांनी, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कीटकजन्य आजारावर नियंत्रण मिळविण्याबाबतची शपथ घेली. प्रभातफेरीदरम्यान पत्रके वाटून, स्टीकर, पोस्टर लावून जनजागृती करण्यात आली. त्यानंतर गप्पीमासे वाटप कार्यक्रमाचे आयोजन प्रत्येक झोनमध्ये करण्यात आले होते. प्रभातफेरीदरम्यान सर्व झोनमधून एकूण ३१०० घरांना भेटी देण्यात आल्या. या भेटीत कुलरमध्ये ३८३०, निरुपयोगी विहिरींमध्ये २७, टाक्यांमध्ये ८१९,

## कस्तुरंचद पार्क सौंदर्यीकरणाच्या सुधारित आराखड्याला हेरिटेज समितीची मंजुरी

नागपूर : कस्तुरचंद पार्कच्या सौंदर्यीकरणाच्या सुधारीत आराखड्याला हेरिटेज संवर्धन समितीने तत्वतः मंजुरी प्रदान केली आहे. पुढील कार्यवाहीसाठी नगररचना विभागाकडे नकाशे सादर करण्यात आले आहे. ११ मे रोजी मनपा मुख्यालयातील नगररचना विभागात नीरीचे माजी संचालक डॉ.तपन चक्रवर्ती यांच्या अध्यक्षतेखाली हेरिटेज संवर्धन समितीची बैठक पार पडली.यावेळी समितीचे सदस्य वास्तुविशारद अशोक मोखा, इतिहास विभागाच्या प्र–पाठक डॉ.शोभा जोहरी, स्ट्रक्चरल अभियंता पी.एस.पाटणकर, एलएडी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. उज्ज्वला चक्रदेव, नगररचना नागपूर विभागाच्या सहायक संचालक सुप्रिया थूल, मनपाचे नगररचनाकार श्री. सोनारे, नागपूर मेट्रोरेल्वेचे अतिरिक्त महाप्रबंधक राजीव येलवटकर प्रामुख्याने उपस्थित होते. कस्तुरचंद पार्क येथे जनसुविधा अंतर्गत जॉगिंग, वॉकिंग, सायकल ट्रॅक, वृक्षलागवड, हिरवळ इत्यादी कामे करण्याकरिता मनपाच्या प्रकल्प विभागाद्वारे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मागील बैठकीत समितीला दोन वेगवेगळे प्रस्ताव प्राप्त झाल्याने सुधारीत आराखडे पुढील बैठकीत सादर करण्याचे आदेश समितीने दिले होते. त्यानुसार प्रकल्प विभागाने सुधारीत आराखडे सादर केले. समितीने सर्व बाबी तपासून आराखड्यांना मंजुरी देत पुढील कार्यवाहीकरिता ते नगररचना विभागाकडे पाठविले आहे. झिरो माईल परिसरात नागपूर मेट्रो रेल्वेतर्फे 'हेरिटेज वॉक' तयार करण्याचा प्रस्ताव या बैठकीत आला. त्याला समितीने मंजुरी प्रदान करीत पुढील बैठकीत त्याचे सादरीकरण करावे, असे सूचित केले. झिरो माईल स्तंभाची व परिसराची देखभाल व दुरूस्ती नागपूर मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने करावी, असे निर्देश समितीने दिले. सेमिनेरी हिल्स परिसरात सेंटर पॉईंट शाळेने हेरिटेज समितीची परवानगी न घेता बांधकाम केले आहे. याबाबत विवेक सिंग यांनी परिसरातील झाडांची आणि पर्यावरणाची हानी होत असल्याची तक्रार समितीकडे केली. यासंदर्भात समितीचे अध्यक्ष डॉ.तपन चक्रवर्ती यांनी डॉ.उज्ज्वला चक्रदेव यांच्या अध्यक्षतेखाली एक उपसमिती नेमण्याचे आदेश दिले. या उपसमितीत अशोक मोखा आणि श्री. पाटणकर हे दोन सदस्य म्हणून काम करतील. ही उपसमिती तपास करून योग्य तो निर्णय घेईल, असे श्री. चक्रवर्ती यांनी सांगितले.

# नागपूर मनपा आणि युरोपियन युनियनमध्ये भागीदारी करार

## शाश्वत शहरी विकास, स्मार्ट सिटी मिशनच्या गरजेसंदर्भात कृती आराखडा तयार करणार

नागपूर : नागपूर महानगरपालिका आणि युरोपियन युनियन यांच्यामध्ये बुधवारी (ता. २३) इंटरनॅशनल अर्बन को–ऑपरेशन (आययूसी) या कार्यक्रमांतर्गत भागीदारी करार झाला. नागपूर (भारत) आणि कार्लस्रू (जर्मनी) या शहरांच्या शहरी विकासातील प्राथमिकतांमधील सहकार्याचे क्षेत्र ओळखण्यासाठी आणि विस्तारासाठी हा भागीदारी करार करण्यात आला आहे. या करारावर नागपूरच्या वतीने महापौर नंदा जिचकार, महानगरपालिका आयुक्त वीरेंद्र सिंह आणि कार्लस्रूच्या वतीने आयूसीचे भारतातील कार्यक्रम संचालक पियर रॉबर्टो रेमिटा यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी विरोधी पक्ष नेता तानाजी वनवे, अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, स्मार्ट ण्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि.चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रामनाथ सोनवणे, सहायक आयुक्त (सामान्य प्रशासन) महेश धामेचा, कार्यकारी अभियंता (विद्युत) संजय जैस्वाल, कार्यकारी अभियंता (प्रकल्प) नरेश बोरकर उपस्थित होते. भारत या कार्यक्रमांतर्गत नागपूर आणि कार्लस्रू हे संयुक्तपणे विशेषत: शाश्वत शहरी विकास आणि भारतातील स्मार्ट सिटी मिशनच्या गरजेसंदर्भात स्थानिक कृती योजना तयार करणार आहेत. या करारावर स्वाक्षरी करण्याआधी आय.यू.सी.चे भारताचे प्रतिनिधी आशीष वर्मा (शाश्वत विकास तज्ज्ञ) यांनी प्रकल्पाबद्दल सादरीकरणाद्वारे थोडक्यात माहिती दिली. सदर कार्यक्रमाचा उद्देश, अंमलबजावणीची प्रक्रिया आणि शहरांमध्ये असलेल्या समस्यांची माहिती दिली. नागपूर स्मार्ट ण्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रामनाथ सोनवणे यांनी नागपूर शहर, संधी आणि आव्हाने याबाबत थोडक्यात माहिती दिली. आययूसी कार्यक्रम नागपूर शहराला ज्ञान विनिमय योजनेच्या दृष्टीने कशी मदत करतो हे सांगताना स्मार्ट सिटी नियोजनाची अंमलबजावणी याबाबत महत्त्वाचे मुद्दे विषद केले. शहरी विकास आणि नगरपालिका सेवांना एकत्रित करण्यास प्राधान्य, कार्बनचा कमी उपयोग आणि शहरी नवीनीकरण, शाश्वत गतीशीलता याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. शहरी विकासाच्या प्राथमिकतांना अंमलात आणण्यासाठी त्यांना सर्वोत्तम धोरण ओळखण्यासाठी व अंदाज घेण्यासाठी आय.यू.सी–भारत संघ आणि कार्लस्रू शहराने कार्य करावे, अशी विनंती केली. नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त वीरेंद्र सिंह म्हणाले, नागपूर शहरातील शाश्वत शहरी विकासाशी संबंधित मुद्द्यांबद्दल नागपूर शहर जाणून घेण्यासाठी व युरोपीय शहरांमध्ये काम करण्याची ही उत्तम संधी आहे. या भागीदारीमुळे नागपूर आणि कार्लस्रू हे शाश्वत शहरी विकासाशी संबंधित विषयांवर एकत्रितपणे काम करतील. यामध्ये शहरी गतिशीलता, कमी कार्बन उत्सर्जन आणि शहरी नवीन उपक्रम तसेच शहरी विकास आणि नगरपालिका सेवांचे एकीकरण यांचा समावेश असेल. कार्लस्रू शहर स्मार्ट तंत्रज्ञानाचा वापर करीत आहे. त्यांच्या गतिशीलता योजनेचे मॉडेल खूप उत्साहवर्धक आहे. नागपूर आणि कार्लस्रू यांच्यातील ज्ञानविनिमय सक्षम होईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. महापौर नंदा जिचकार यांनीदेखिल या कार्यक्रमाचे स्वागत केले आहे. जागतिक हवामानातील बदल आणि शाश्वत शहरी विकासाच्या उद्दिष्टांपर्यंत पोहोचण्यासाठी महत्त्वाकांक्षी पद्धतीने काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. त्या म्हणाल्या, हवामान बदलाचा प्रतिकुल परिणाम नागरिकांच्या जीवनावर होऊ लागला आहे. बदललेले वातावरण आणि नैसर्गिक पर्यावरणाचा निकृष्ट दर्जा यासाह आता हवामान बदलाच्या प्रतिकुल परिणामांवर मात करण्यासाठी ठळक आणि अभिनव कृती करणे कार्लस्रूच्या सहकार्याने आय.यू.सी. कार्यक्रमाद्वारे होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भविष्यात नागपुरातील भावी पिढीने चांगले जीवन जगावे अशी आपली इच्छा असून या कार्यक्रमासाठी आपण पूर्ण सहकार्य करू, असेही त्यांनी म्हटले.

## नागपूर शहराला नावीन्यपूर्ण व उत्कृष्ट कार्यशैलीचा पुरस्कार

नागपूर : 'स्वच्छ सर्वेक्षण २०१८' चे पुरस्कार १६ मे रोजी नवी दिल्लीत जाहीर करण्यात आले. नागपूर हे शहर स्वच्छ सर्वेक्षणात देशातील 'नावीन्यपूर्ण व उत्कृष्ट कार्यशैली' असणारे शहर ठरले आहे नवी दिल्ली येथे केंद्रीय गृहनिर्माण व शहरविकास मंत्री हरदीपसिंग पुरी ह्यांनी या पुरस्कारांची घोषणा केली. महाराष्ट्र हे सर्वाधिक स्वच्छ शहरांच्या यादीत दुसऱ्या क्रमांकाचे राज्य ठरले आहे. महाराष्ट्रातील एकूण नऊ शहरांना पुरस्कार मिळाले असून सहा राष्ट्रीय स्तरावरचे तर तीन विभागीय स्तरावरचे पुरस्कार आहेत. राष्ट्रीय स्तरावर मिळालेल्या पुरस्कारामध्ये नागपूर शहराचा समावेश आहे. नागपूरच्या महापौर नंदा जिचकार आणि तत्कालीन आयुक्त तथा जिल्हाधिकारी अश्विन मुदगल यांच्या नेतृत्वात नागपूर शहराने ही कौतुकास्पद कामगिरी बजावली आहे. लोकसहभागासाठी वेळोवेळी आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार नागपुरकरांनीही जनजागृती मोहिमेत सहभाग घेतला. लोकप्रतिनिधी, मनपाचे पदाधिकारी, नगरसेवक, अधिकारी, कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी, स्वच्छ्ता दूत आदीच्या सामूहिक प्रयत्नातून नागपूर शहराने ही यशश्री खेचून आणली. अतिरिक्त उपायुक्त डॉ. जयंत दांडेगावकर, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ. प्रदीप दासरवार, स्वच्छता ॲम्बेसेडर डॉ. चंद्रशेखर मेश्राम, आरजे निकेता साने, हास्य कवि मधुप पांडेय, डॉ. अमित समर्थ, कौस्तभ चैटर्जी यानीही जनतेचे आभार मानले आहे.

**जनतेचे आभार : महापौर नंदा जिचकार**

नागपूर शहराने स्वच्छ सर्वेक्षणात मारलेली मुसंडी हे सामूहिक प्रयत्नाचे फलित आहे. पदाधिकारी, नगरसेवक, अधिकारी, कर्मचारी यांच्या योगदानासोबतच जनतेने या सर्वेक्षणात जो भरभरून प्रतिसाद दिला, त्याबदल जनता आणि सर्वांचे महापौर या नात्याने मी आभार मानते आणि सर्व नागपूरकरांचे अभिनंदन करते.

**नागपूरकरांचे अभिनंदन : आयुक्त वीरेंद्र सिंह**

स्वच्छता सर्वेक्षणात बाजी मारल्याबद्दल नागपूरांसह सर्व अधिकारी, कर्मचारी, पदाधिकाऱ्यांचे मी अभिनंदन करतो. यापुढेही अशीच सामूहिक कामगिरी करून सर्व क्षेत्रात यश प्राप्त करू.

## नदी स्वच्छता अभियानाचा थाटात शुभारंभ



नागपूर : नागपूर महानगरपालिकेद्वारे संसद जल व पर्यावरण रक्षण योजनेअंतर्गत २० जूनपर्यंत राबविण्यात येणाऱ्या नदी स्वच्छता अभियानाचा शुभारंभ ७ मे रोजी करण्यात आला. नाग नदी, पिवळी नदी, पोरा नदी या तीनही नद्यांच्या स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ विधीवत पूजा करून महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते करण्यात आला.



## तलाव स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी आपलीच : आयुक्त

### महापालिकेद्वारे फुटाळा तलाव स्वच्छता अभियान

नागपूर : शहरातील सर्व जलाशये आणि तलाव ही आपलीच संपत्ती आहे. त्याला स्वच्छ ठेवण्याची जबाबदारीही आपलीच आहे. मागील काही वर्षापासून नागपूर महानगरपालिका शहरातील अन्य शासकीय यंत्रणा व स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने नद्या व सरोवरे स्वच्छता अभियान राबवित आहे. परंतु नद्या व तलाव स्वच्छ केल्यानंतर त्या ठिकाणी कचरा व घाण न टाकता, तलावाची स्वच्छता राखण्यास सर्व नागरिकांनी व स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घ्यावा, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी तलाव स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे, असे आवाहन आयुक्त वीरेंद्र सिंह यांनी केले.२७ मे रोजी सकाळी ७ ते ९ या दरम्यान फुटाळा तलाव येथे स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. यावेळी अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, अतिरिक्त उपायुक्त जयंत दांडेगावकर, राजेश मोहिते, उच्च न्यायालच्या नागपूर खंडपीठाचे प्रबंध श्री.शर्मा, आरोग्य अधिकारी डॉ.प्रदीप दासरवार, नगररचना विभागाचे सहायक संचालक प्रमोद गावंडे, कार्यकारी अभियंता अनिरूद्ध चौगंजकर, धरमपेठ झोन सहायक आयुक्त महेश मोरोणे, सतरंजीपुरा झोन सहायक आयुक्त प्रकाश वराडे, लकडगंज झोनचे सहायक आयुक्त सुभाष जयदेव, नेहरूनगर झोन सहायक आयुक्त राजेश कराडे, उद्यान अधीक्षक अमोल चोरपगार, पशूचिकित्सक डॉ.गजेंद्र महल्ले, उपअभियंता आर.व्ही.मुळे, रवी बुंधाडे, उप मुख्य अग्निशमन अधिकारी बी.पी.चंदनखेडे, सहायक जनसंपर्क अधिकारी प्रदीप खर्डेनवीस प्रामुख्याने उपस्थित होते. नागपूर महानगरपालिकेद्वारे शहरातील सर्व जलाशये, तलाव, सरोवरे स्वच्छ करण्याची मोहिम राबविण्यात येत आहे. यावेळी फुटाळा तलाव व परिसराची आयुक्त वीरेंद्र सिंह यांनी पाहणी केली. तलावातील जलपर्णी काढण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे, हे बघून त्यांनी समाधान व्यक्त केले. तलावाच्या काठावर असलेली झाडे व झुडुपे, गाळ त्याची योग्य विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने काढण्यात वासूसेना मुख्यालयाला व भांडेवाडी डम्पिंग यार्ड येथे कंपोस्ट करण्यासाठी देण्यात यावे, असे निर्देश दिले. तलावाच्या किनाऱ्यावर असलेल्या झाडांच्या फांद्या वाढलेल्या आहे. त्या छाटून टाकाव्या, पण झाडांचे सौंदर्यीकरण बिघडता कामे अशा प्रकारे छाटण्यात याव्या, असेही त्यांनी सुचविले. फुटाळा येथील तलाव स्वच्छता अभियानात पर्यावरण प्रेरणा विदर्भ, स्वच्छ असोसिएशन, सेंटर फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट, नीरी, ऑल इंडिया इन्सिट्युट ऑफ लोकल गव्हर्मेंट, भारतीय वायुसेना, वायुसेनानगर मुख्यालय, ४ महाराष्ट्र बटालियन एनसीसी नेव्हल विंग, नागपूर गार्डन क्लब, तलाव बचाव समिती, ईक्की सिटी, मनपा अग्निशमन विभाग, सर्प मित्र, सर्व झोनचे अधिकारी व कर्मचारी यांचा सहभाग होता.

# पाणी व्यवस्थापन प्रणालीत सुधारणा करा : कुकरेजा

नागपूर : नागपुरात पाच लाख ३२ हजार मालमत्ता आहेत. त्यानुसार पाणी कनेक्शनही याच तुलनेत असायला हवे. कर विभागासोबत जलप्रदाय विभागाने समन्वय साधून तातडीने नवीन कनेक्शन द्यावे, ग्राहकांकडे असलेली थकबाकी वसूल करण्यासाठी विशेष पथक लावावे, चोरी गेलेल्या मीटरबाबत एनईएसएलने तातडीने निर्णय घ्यावा आणि नव्याने मीटर द्यावे आणि चालू आर्थिक वर्षात पाणी बिल वसुलीपोटी ३०० कोटींचे उद्दिष्ट ठेवावे, असे निर्देश स्थायी समितीचे सभापती वीरेंद्र कुकरेजा यांनी दिले.डीआरए नामक कन्सल्टन्सीने सादर केलेला प्रकल्प राबविण्याचे कार्य ओसीडब्ल्यू करीत आहे. मात्र डीआरएच्या कार्यप्रणालीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करीत स्थायी समिती सभापतींनी नाराजी व्यक्त केली. यासंदर्भातही एनईएसएलने तातडीने निर्णय घ्यावा, असेही निर्देश सभापती कुकरेजा यांनी दिले. नागपूर शहरात होणारा पाणीपुरवठा, नागरिकांच्या तक्रारी, थकीत बिलाची वसुली, अवैध नळ कनेक्शनचे नियमितीकरण, अमृत योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांची प्रगती आदी विषयांवर सभापती वीरेंद्र कुकरेजा यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी (ता. १८) मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती सभागृहात विशेष बैठक पार पडली. बैठकीला मनपा आयुक्त वीरेंद्र सिंह, जलप्रदाय समितीचे सभापती पिंटू झलके, ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी, अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, नगरसेवक सुनील हिरणवार, मनोज सांगोळे, शेषराव गोतमारे, जुल्फेकार भुट्टो, राजेश मानकर, नगरसेविका सोनाली कडू, मंगला खेकरे, अर्चना पाठक, विद्या कन्हेरे, मनिषा अतकरे, अभिरुची राजगिरे, कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) संजय गायकवाड, कार्यकारी अभियंता प्रदीप राजगिरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मोना ठाकूर, लेखाधिकारी शिंदे, ओसीडब्ल्यूचे सर्वश्री मुख्य कार्यकारी अधिकारी संजय रॉय, उपसंचालक (ग्राहक सेवा) राहुल कुलकर्णी, उपसंचालक राजेश कालरा उपस्थित होते. सध्या नागपुरात तीन लाख ३० हजार एकूण नळ कनेक्शन असून त्यापैकी दोन लाख ४० हजार ग्राहकांच्या मीटरची रीडींग घेण्यात येते. ५३ हजार ग्राहकांना सरासरी बिल पाठविण्यात येते तर २२ हजार ग्राहकांना फ्लॅट बिल पाठविण्यात येते. थकबाकीदारांमध्ये ५० हजार ते एक लाख थकबाकी असलेले २२७६ ग्राहक आहेत. त्यांच्याकडे सुमारे १५ कोटी रुपयांची थकबाकी आहे. एक लाखांवरील थकबाकीदार ७९३ आहेत. पाच हजारांपेक्षा कमी थकबाकी असलेल्या ग्राहकांची संख्या एक लाख २४ हजार आहे. एक लाखांपर्यंत थकबाकी असलेल्या २२७६ पैकी १८०० ग्राहकांची नळ जोडणी कापली असून अन्य ग्राहकांना नोटीस देण्यात आले असल्याची माहिती ओसीडब्ल्यूच्या अधिकाऱ्यांनी दिली. ज्या ग्राहकांचे मीटर चोरीला गेले आहे, अशा ग्राहकांकडे पुढील १५ दिवसांत मीटर लागायला हवे. यासाठी ग्राहकांना प्रथम नोटीस देण्यात यावी. १५ दिवसांत ग्राहकांनी मीटर बदलवावे, अन्यथा मनपा ते मीटर बदलवेल. मीटरची किमत सहा महिन्यांत बिलामधून टप्प्याटप्प्याने वसूल केली जाईल, असे निर्देश सभापती कुकरेजा यांनी दिले. यावर झालेल्या चर्चेनंतर ग्राहकांनी ५० टक्के रक्कम द्यावी, ५० टक्के रक्कम ओसीडब्ल्यूने भरावी, अशी सूचना काही सदस्यांनी दिली. चर्चेअंती हा विषय निर्णय घेण्यासाठी एनईएसएलकडे पाठविण्याचे निर्देश सभापती वीरेंद्र कुकरेजा यांनी दिले.

## तलाव स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी आपलीच : आयुक्त

### महापालिकेद्वारे फुटाळा तलाव स्वच्छता अभियान

नागपूर : शहरातील सर्व जलाशये आणि तलाव ही आपलीच संपत्ती आहे. त्याला स्वच्छ ठेवण्याची जबाबदारीही आपलीच आहे. मागील काही वर्षापासून नागपूर महानगरपालिका शहरातील अन्य शासकीय यंत्रणा व स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने नद्या व सरोवरे स्वच्छता अभियान राबवित आहे. परंतु नद्या व तलाव स्वच्छ केल्यानंतर त्या ठिकाणी कचरा व घाण न टाकता, तलावाची स्वच्छता राखण्यास सर्व नागरिकांनी व स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घ्यावा, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी तलाव स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे, असे आवाहन आयुक्त वीरेंद्र सिंह यांनी केले. २७ मे रोजी सकाळी ७ ते ९ या दरम्यान फुटाळा तलाव येथे स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. यावेळी अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, अतिरिक्त उपायुक्त जयंत दांडेगावकर, राजेश मोहिते, उच्च न्यायालच्या नागपूर खंडपीठाचे प्रबंध श्री.शर्मा, आरोग्य अधिकारी डॉ.प्रदीप दासरवार, नगररचना विभागाचे सहायक संचालक प्रमोद गावंडे, कार्यकारी अभियंता अनिरूद्ध चौगंजकर, धरमपेठ झोन सहायक आयुक्त महेश मोरोणे, सतरंजीपुरा झोन सहायक आयुक्त प्रकाश वराडे, लकडगंज झोनचे सहायक आयुक्त सुभाष जयदेव, नेहरूनगर झोन सहायक आयुक्त राजेश कराडे, उद्यान अधीक्षक अमोल चोरपगार, पशूचिकित्सक डॉ.गजेंद्र महल्ले, उपअभियंता आर.व्ही.मुळे, रवी बुंधाडे, उप मुख्य अग्निशमन अधिकारी बी.पी.चंदनखेडे, सहायक जनसंपर्क अधिकारी प्रदीप खर्डेनवीस प्रामुख्याने उपस्थित होते. नागपूर महानगरपालिकेद्वारे शहरातील सर्व जलाशये, तलाव, सरोवरे स्वच्छ करण्याची मोहिम राबविण्यात येत आहे. यावेळी फुटाळा तलाव व परिसराची आयुक्त वीरेंद्र सिंह यांनी पाहणी केली. तलावातील जलपर्णी काढण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे, हे बघून त्यांनी समाधान व्यक्त केले. तलावाच्या काठावर असलेली झाडे व झुडुपे, गाळ त्याची योग्य विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने काढण्यात वासूसेना मुख्यालयाला व भांडेवाडी डम्पिंग यार्ड येथे कंपोस्ट करण्यासाठी देण्यात यावे, असे निर्देश दिले. तलावाच्या किनाऱ्यावर असलेल्या झाडांच्या फांद्या वाढलेल्या आहे. त्या छाटून टाकाव्या, पण झाडांचे सौंदर्यीकरण बिघडता कामे अशा प्रकारे छाटण्यात याव्या, असेही त्यांनी सुचविले. फुटाळा येथील तलाव स्वच्छता अभियानात पर्यावरण प्रेरणा विदर्भ, स्वच्छ असोसिएशन, सेंटर फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट, नीरी, ऑल इंडिया इन्सिट्युट ऑफ लोकल गव्हर्मेंट, भारतीय वायुसेना, वायुसेनानगर मुख्यालय, ४ महाराष्ट्र बटालियन एनसीसी नेव्हल विंग, नागपूर गार्डन क्लब, तलाव बचाव समिती, ईक्की सिटी, मनपा अग्निशमन विभाग, सर्प मित्र, सर्व झोनचे अधिकारी व कर्मचारी यांचा सहभाग होता.